Exh NO. 26/D

रे.क. नं. ५/२०२६

मे. दिवाणी न्यायाधीशसो, क.स्तर, कागल
यांचे कोर्टात

श्री. सुनिल नारायण कांबळे ....... वादी

वि.

१) श्री. भिकाजी शिवाजी इंगळे ....... प्रतिवादी

वै.३

Order
-----------------
Other Side to say

दि.प्र.सं.क ७५ व क २६ नियम ९ नुसार न्यायालय आयुक्त नियुक्तीबाबतचा अर्ज अथवा मोजणी करून घेणेबाबतचा अर्ज.

यातील वादी यांचा विनंती अर्ज कि,

१) सदर वादी यांनी मे. कोर्टात मौजे सेनापती कापशी, ता. कागल, जि. कोल्हापूर येथील गट नं.७१४ मधील वादी व प्रतिवादी यांचे असणारे क्षेत्राच्या बाबत हद्द निश्चित होवून कायम मनाई होणेबाबतचा दावा मे. कोर्टात चालु आहे. सदर दाव्या मध्ये जैसे थे परिस्थिती

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

अर्जास व नि.५ व मुळ दाव्यास प्र.वादी नं.२ यांनी म्हणणे / कैफियत दिलेले आहे. प्र.वादी नं.१ व ३ ने जैसे थे परिस्थिती अर्जास व नि.५ अर्जास म्हणणे दिलेले आहे. तसेच प्र.वादी नं.४ याचे विरूध्द एकतर्फा आदेश झालेला आहे. सदर प्र.वादी नं.१ व ३ यांचे जोरात बांधकाम चालु आहे. सदर वादी यांनी प्र.वादी नं.४ यांचेकडून घेतलेले एकुण क्षेत्र १९ x ५६ हे भरत नसुन प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी वादीच्या हद्दी मध्ये अतिक्रमण करून सदरचे घराचे बांधकाम चालु आहे व कंपाऊंड केलेले आहे. सदर कामी सध्या जी काही प्राप्त परिस्थिती अथवा असणारी वस्तुस्थीती यांचा योग्य तो रिपोर्ट अथवा कागदोपत्री माहिती मे. कोर्टा समोर सदरच्या वादी व प्र.वादी नं.१ ते ३ यांच्याकडे असले क्षेत्राबाबतची मोजणी करून तसा रिपोर्ट मे. कोर्टा मध्ये देणे बाबतचा आदेश मे. कोर्टानी करणे न्यायाचे व गरजेचे आहे. तसेच सदर वादी व प्र.वादी नं.१ ते ३ यांच्याकडे असले योग्य त्या क्षेत्राची सध्याची स्थिती काय आहे. याबाबत खरी व योग्य कायदेशीर माहीती मे. कोर्टासमोर येणे न्यायाचे व गरजेचे असलेने सदरचा अर्ज वादी यांनी दाखल केलेला आहे.

सदर वादी व प्रतिवादी यांच्या मिळकती या स्वखर्चाने जे कांही क्षेत्र खरेदी करून घराचे बांधकाम किती क्षेत्रात चालू आहे हे मे. कोर्टासमोर येणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदर संपुर्ण गोष्टींचा निवाडा होणेसाठी योग्य त्या तज्ञ मोजणी अधिकारी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नियुक्ती करून मोजणीचा अथवा असलेल्या क्षेत्राचा आवश्यक तो रिपोर्ट लवकरात लवकर मे. कोर्टात दाखल करणे कामी आदेश देणेआवश्यक व जरूरीचे आहे.

Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

**<u>सबब वादी यांची विनंती कि</u>,**

अ) मौजे सेनापती कापशी, ता. कागल, जि. कोल्हापूर येथील गट नं. ७१४ मधील वादी व प्र.वादी नं.१ ते ३ यांनी स्वत: खरेदी केलेल्या मिळकतीचे क्षेत्राची योग्य ती मोजणी करून त्यांचा योग्य तो अहवाल मे. कोर्टात पाठवून सदर अहवाला मध्ये क्षेत्राची लांबी-रूंदी नमूद करून नकाशा व अहवाल सादर करणेसाठी योग्य त्या मोजणी अधिकारी यांची नियुक्ती करणे न्यायाचे व गरजेचे आहे.

ब) प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत यावा.

क) न्यायाचे अन्य हुकूम याच कामी वादी यांचे वतीने व्हावेत.

येणेप्रमाणे अर्ज असा.

कागल — मे.जा. व्हावे

ता.२७/०३/२०२६

Snkamble

वादी

## <u>प्रतिज्ञा</u>

मी यातील वादी,श्री. सुनिल नारायण कांबळे,वय ५० वर्षे, धंदा : शेती/व्यापार रा.मौजे सेनापती कापशी, ता. कागल, जि. कोल्हापूर शपथपूर्वक कथन करतो की, वरील अर्जातील संपूर्ण मजकुर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केली प्रतिज्ञा.

Snkamble

ठिकाण : कागल — प्रतिज्ञा करणार

दिनांक : २७/०३/२०२६

Bpatil
Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

## ॲफिडेव्हीट

मी यातील वादी,श्री. सुनिल नारायण कांबळे,वय ५० वर्षे, धंदा : शेती व्यापार ... रा.मौजे सेनापती कापशी, ता. कागल, जि. कोल्हापूर शपथपूर्वक कथन करते की, वरील अर्जातील व प्रतिज्ञे मधील संपूर्ण मजकुर माझे उत्तम माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केले ॲफिडेव्हीट.

ठिकाण : कागल

दिनांक : २७/०३/२०२६

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो

ॲडव्होकेट

## प्रतिज्ञा

मी यातील वादी,श्री. सुनिल नारायण कांबळे,वय ५० वर्षे, धंदा : शेती व्यापार... रा.मौजे सेनापती कापशी, ता. कागल, जि. कोल्हापूर शपथपूर्वक कथन करतो की, वर नमुद अर्जातील व ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकुर माझे उत्तम माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केली सत्य प्रतिज्ञा.

ठिकाण : कागल

दिनांक : २७/०३/२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri Sunil Narayan Kamble
Age 50 of Kapsi, Kagal who is
identified by Shri A.M. Patsawale Adv
............whom I know personally
Dated :- 27/3/26

Assistant Superintendent

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.03.27 17:25:51 +0900